# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

### ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ६६ वी बैठक दि. ५ जानेवारी २०११ रोजी मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, विशेष निमंत्रित, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. ना. राजेंद्र मुळक | ... | राज्यमंत्री, जलसंपदा व पदसिध्द उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | विसस व उपाध्यक्ष |
| ४. | मा. इं. एकनाथ बा. पाटील | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ५. | मा. इं. एकनाथ बा. पाटील | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य (अ.का.) |
| ६. | इं. प्रफुल्लचंद्र झपके | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**विशेष निमंत्रित**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | मा. उपाध्यक्ष |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. रा. मा. भुते, उप सचिव | ... | प्रधान सचिव (नियोजन) व सदस्य यांचे प्रतिनिधी |
| २. | श्री. मधुकर स. कांबळे, अवर सचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. चं. आ. बिराजदार | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| ३. | श्री. अ.स. शिरुडे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) |
| ४. | इं. खलील अन्सारी | ... | अ.अ., कोल्हापूर पाटबंधारे मंडळ, कोल्हापूर |
| ५. | इं. कि. भा. कुलकर्णी | .... | अ.अ., सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा |
| ६. | इं. ब. दा तोंडे | ... | अ.अ. व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर |
| ७. | इं. दि. मा. सोनवलकर | ... | अ.अ. कृष्णा कोयना उपसा सिंचन प्रकल्प मंडळ, सांगली |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

ठराव

**ठराव क्र.६६/१**

**"नियामक मंडळाच्या ६४ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."**

---

**ठराव क्र.६६/२**

**"ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाच्या ६५ व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव कायम करण्यात येत आहेत."**

---

**ठराव क्र.६६/३**

**"ठराव करण्यात येतो की सन २००९-१० या वर्षाचे प्रकल्प विकास लेखापत्रक व ३१/३/२०१० अखेरचा ताळेबंद स्वीकृत करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

---

**ठराव क्र.६६/४**

**"ठराव करण्यात येतो की, भारतनिर्माण कार्यक्रमांतर्गत जाधववाडी, ता.फलटण, जि.सातारा, येथील नियोजीत पाणी पुरवठा योजना, साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्रासाठी (सार्वजनीक कामासाठी) निरा उजवा कालवा कि.मी.४९/४९५ लगतची कालव्यासाठी संपादित केलेली ०.९६ हे. जागा भविष्यात जलसंपदा विभागास / महामंडळास लागणार नसल्याने सदरच्या जागेचे प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटींवर व नियमानुसार पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

---

**ठराव क्र.६६/५**

**"ठराव करण्यात येतो की, उजनी प्रकल्पांतर्गत अकोले खुर्द सुर्ली, ता.माढा, जि.सोलापूर येथील ग.न.६७ च्या १३ हे.१५ आर एवढ्या क्षेत्रापैकी ८० आर जागा महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस ३३/११ के.व्ही. उपकेंद्राच्या उभारणीच्या सार्वजनिक कामासाठी लागणारी जागा भविष्यात जलसंपदा विभागास / महामंडळास लागणार नसल्याने या अतिरिक्त असलेल्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटींवर व नियमानुसार पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

ठराव

**ठराव क्र.६६/६**

**"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी अंतर्गत मुख्य अभियंता, अतिउच्च दाब बांधकाम नि.सं.व सु. परिमंडळ, पुणे, यांना १३२ के.व्ही., वरसगाव उपकेंद्रात २५ एम.व्ही.ए. क्षमतेचा जादा ट्रान्सफॉर्मर बसविण्याच्या सार्वजनिक कामासाठी मौजे वरसगांव, ता.मुळशी, जि.पुणे येथील वरसगांव प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेली स.नं. ९ व १० मधील ८६४३.७५ चौ.मी. (८६ आर) जागा भविष्यात जलसंपदा विभागास लागणार नसल्याने या अतिरिक्त असलेल्या जागेची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर व नियमानुसार पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, पुणे, यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

---

**ठराव क्र.६६/७**

**"ठराव करण्यात येतो की, मौजे आलेगांव (बु.), ता.माढा, जि.सोलापूर येथील उजनी प्रकल्पासाठी संपादित केलेल्या गट क्र.४५/ड मधील ४ हे. ५६ आर जमिनीपैकी १ हे. ७९ आर खात्यास आवश्यक असून उर्वरित ३ हे. १७ आर. जमिन अतिरिक्त असल्याने व सदर जमीन भविष्यात लागणार नसल्याने ३ हे. १७ आर या जमिनीची शासकीय दराने येणारी किंमत तरी महामंडळास मिळण्याच्या अटीवर व नियमानुसार पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सोलापूर, यांचेकडे समर्पित करण्यास मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो) व अध्यक्ष यांनी मान्यता दिलेल्या प्रस्तावास नियामक मंडळाची कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे."**

---

**ठराव क्र.६६/८**

**"ठराव करण्यात येतो की, श्री. महादेव सिताराम गुजर व श्री. अशोक नारायण गुजर, रा.पानस, ता.जावळी, जि.सातारा यांच्या घराचे हातगेघर धरणाच्या कामामुळे झालेले नुकसान पाहता व प्रस्तुत घर राहण्यास धोकादायक झाले असल्याने सदरचे घर (मिळकत क्र.१४ व १५) संपादन करुन घराच्या एकत्रित मूल्यांकनाची (घसारा वजा जाता) रक्कम रुपये १,९५,४९६/- (एक लक्ष पंच्याण्णव हजार चारशे शहाण्णव फक्त) नुकसान भरपाई म्हणून संबंधितांना अदा करण्यास "खास बाब" म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

---

**ठराव क्र.६६/९**

**''ठराव करण्यात येतो की, लघु पाटबंधारे तलाव नागनवाडी, ता. भुदरगड, जि.कोल्हापूर, मौजे बारवे येथील धरण बैठक सांडवा, पुच्छ कालवा व मुळ नाला या दरम्यानची असलेली जमीन प्रकल्पासाठी आवश्यक नसल्याने संपादित करण्यांत आलेली नसून सदर जमिनीवर असलेली ४ घरे (खालील**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

ठराव

तक्त्यात दिल्याप्रमाणे) संपादित करण्यास खास बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

| अ. क्र. | गट नंबर | नांव | बांधकाम प्रकार | बांधकाम मूल्य | बांधकाम वर्ष | घसारा किंमत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८४ | श्री. निजाम बाबालाल देसाई | घर | ७३,५१४/- | १९९३ | ६५,२००/- |
| २ | ८२ अ | श्री. बाबासो. खुतुबदीन देसाई | घर | १,३७,९३१/- | १९९७ | १,२७,५००/- |
| ३ | ८१ | श्री. रसूल दादा देसाई, घर नं.१ | घर | १,८७,२३९/- | २००५ | १,८३,५००/- |
| ४ | ८० | श्री. रसूल दादा देसाई, घर नं.२ | घर | ३६,४७९/- | २००१ | ३४,८००/- |
| | | एकूण किंमत | | ४,३५,१६३/- | | ४,११,०००/- |

---

ठराव क्र.६६/१०

"ठराव करण्यांत येतो की, मौजे असवली, ता.खंडाळा, जि.सातारा, येथील गट नं. ४४४ मधील धोम बलकवडी उजव्या कालव्यासाठी संपादित केलेली ९५ आर जमीन अतिरिक्त असल्याने व भविष्यात खात्यास आवश्यक नसल्याने सदर अतिरिक्त जमीनीची शासकीय दराने येणारी किंमत ही किमान गृहित धरुन लिलावाद्वारे मिळणारी महत्तम रक्कम महामंडळास मिळण्याच्या अटीवर व नियमानुसार पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सातारा, यांचेकडे समर्पित करण्यास मान्यता देण्यांत येत आहे."

---

ठराव क्र.६६/११

"ठराव करण्यात येतो की, सहकारी साखर कारखान्यांमार्फत स्वबळावर करण्यात येत असलेल्या प्रकल्पांच्या वितरण व्यवस्थेच्या कामाच्या अनुषंगाने उभयपक्षी करण्यात येणाऱ्या सांमजस्य करारातील अट क्र.८ पुढील प्रमाणे सुधारित करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

साखर कारखान्याने ही कामे स्वतःच्या जबाबदारीवर व जोखमीवर करणे आवश्यक राहील. वितरिकांची बांधकामे व मातीकामे याकरिता आवश्यक असणा-या जमिनींची संमतीपत्रे संबंधित शेतक-यांकडून घेऊन (By Private Negotiations) ती महामंडळाकडे सुपूर्त करण्याची जबाबदारी साखर कारखान्याची राहील. तसेच सर्व भूसंपादन प्रस्ताव साखर कारखान्याने तयार करुन महामंडळाचे क्षेत्रिय अधिकारी यांचेमार्फत महसूल खात्याकडे सादर करुन मंजूर करुन घेणे आवश्यक राहील. महसूल खात्यामार्फत भूसंपादन निधी मागणी प्राप्त झालेनंतर, भूसंपादनासाठी निधी उपलब्धतेनुसार, महामंडळामार्फत निधी उपलब्ध करुन देणेत येईल. तसेच भूसंपादनाची पुढील कार्यवाही महामंडळामार्फत करणेत येईल. संमतीपत्रे प्राप्त झालेशिवाय काम सुरु करता येणार नाही.

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

ठराव

संमतीने अथवा भूसंपादन कार्यवाही पूर्ण करुन जमिन ताब्यात आल्याशिवाय केलेल्या कामाची जबाबदारी साखर कारखान्याची असेल. व त्यामुळे होणाऱ्या नुकसानीस महामंडळ जबाबदार राहणार नाही. सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांचे ताब्यातील रस्त्याच्या ओलांड्याच्या कामाकरीता परवानगी मिळविणे व त्यासाठी आवश्यक शुल्क साखर कारखान्यामार्फत भरणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक ते प्रमाणपत्र महामंडळाकडून देण्यात येईल.

ज्या प्रकल्पांना आता निधी उपलब्ध झाला आहे अशा प्रकल्पातील कामे येथून पुढे निविदा न मागविता सहकारी साखर कारखान्यांना देण्याची कार्यपध्दत बंद करण्यात यावी व यापुढील येणारे असे प्रस्ताव मान्य करण्यात येणार नाहीत."

---

ठराव क्र.६६/१२

"महामंडळातंर्गत अंशतः कार्यान्वित झालेल्या उपसा सिंचन योजनांवरील खर्च (देखभाल दुरुस्ती, सिंचन व्यवस्थापन व परिरक्षण) प्रकल्पास उपलब्ध असलेल्या नियतव्ययातून प्रकल्प अंदाजपत्रकातील 'प' देखभाल या उपशिर्षातर्गत करण्याचे प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावेत."

---

ठराव क्र.६६/१३

"वेगवर्धीत सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या महामंडळातील प्रकल्पांचा सन २०१०-११ च्या सलगता प्रस्तावानुसार आर्थिक व भौतिक कार्यक्रम" हा विषय नियामक मंडळाच्या अवलोकनार्थ सादर केला असल्याने याबाबत कोणताही ठराव पारित केला नाही.

---

मा. अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेचे विषय

ठराव क्र. ६६/१४

"ठराव करण्यात येतो की, उजनी प्रकल्पाच्या कालव्यासाठी संपादित केलेले मौ. केगाव, ता.उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील गट क्र. ६/४ब, ६३/१, ६४ व ६५ ची अनुक्रमे ०.५६ हे., ०.२४ हे., ०.१७ हे व ०.२८ हे. अशी एकूण १.२५ हे. क्षेत्राची जमीन, कालवा संरेखा बदलल्याने महामंडळास भविष्यात लागणार नसल्याने त्या जमिनीची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडून आल्यास किमान त्या जमिनीची शासकीय दराने येणारी किंमत तरी महामंडळास मिळण्याच्या अटीवर तसेच जिल्हाधिकारी, सोलापूर, यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यास व नियमानुसार पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर, यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सोलापूर, यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

ठराव

**ठराव क्र. ६६/१५**

“ठराव करण्यात येतो की, यशवंतसागर जलाशयावरील (उजनी धरण) मत्स्य व्यवसायाच्या ठेक्याच्या निविदेबाबत निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार मा. मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना प्रदान करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

---

**ठराव क्र. ६६/१६**

“जलसंपदा विभागाकडील नीरा डावा कालवा कि.मी.७८ मधील सा.क्र. ७७/३४० ते ७७/४६५ मधील सेवापथ बाजूची बारामती नगरपालिका हद्दीतील गट क्र.२६६ मधील ६२५ चौ.मी. जागा विभागास / महामंडळास भविष्यात लागणार नसल्याने किमान त्या जमिनीची शासकीय दराने येणारी किंमत तरी महामंडळास मिळण्याच्या अटीवर तसेच जिल्हाधिकारी, पुणे, यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यास व नियमानुसार उचित पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे, यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, पुणे, यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

---

**ठराव क्र. ६६/१७**

“ठराव करण्यात येतो की, मौजे तरंगवाडी, ता. इंदापूर जि.पुणे येथील सर्व्हे नं.११२/अ-१ मधील क्षेत्र ०.४० आर व मौजे इंदापूर, ता. इंदापूर, जि. पुणे येथील सर्व्हे नं. २१४/१/अ मधील क्षेत्र ०.४२ आर अतिरिक्त असून सदर जमिनी महामंडळास भविष्यात लागणार नसल्याने त्या जमिनींची कमीत कमी शासकीय दराने येणारी किंमत तरी महामंडळास मिळण्याच्या अटीवर तसेच जिल्हाधिकारी, पुणे, यांचेकडून मागणी आल्यामुळे यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्यास व नियमानुसार उचित पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, पुणे, यांनी करणेच्या अटीच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, पुणे, यांचेकडे कायमस्वरुपी वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.”

---

**ठराव क्र. ६६/१८**

“ठराव करण्यात येतो कि, तारळी मोठ्या प्रकल्पामधील कोपर्डे पोहोच कालव्यासाठी ३० मी. रुंदीने संपादीत कराव्या लागणाऱ्या ६८.८८ हे. क्षेत्रासाठी खाजगी पद्धतीने भूसंपादन करणेसाठी प्रचलित रेडी रेकनरमधील दरापेक्षा १.८८ पट जादा दराने भूसंपादन करण्याचे व त्या प्रित्यर्थ होणाऱ्या रु.२.५५ कोटी एवढ्या जादा खर्चास / आर्थिक दायित्वास खास बाब म्हणून नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.”

---

**ठराव क्र. ६६/१९**

“ठराव करण्यात येतो की, श्री. ज्ञा.द. शिंदे, वकील, यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे ‘कायदे सल्लागार’ पदी दिनांक ०१/०९/२००९ ते ३१/०८/२०१० पर्यंत नियुक्ती केलेली आहे. सदर

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ६६ वी बैठक दिनांक ५ जानेवारी २०११

ठराव

**नियुक्तीस दिनांक ०१/०९/२०१० ते ३१/०८/२०११ पर्यंत पूर्वीच्याच अटी व शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात येत आहे.”**

**“मान्य”**

सही/-
(इंजि. प्रफुल्लचंद्र. चं. झपके)
कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे.

सही/-
(मा. ना. श्री. रामराजे नाईक-निंबाळकर)
मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे.